# महाराष्ट्र विधानपरिषद

## पत्रक भाग दोन

## मंगळवार, दिनांक १८ जुलै, २०२३/ आषाढ २७, १९४५ (शके)

**१००.** महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०२ (३) अन्वये मंगळवार, दिनांक १८ जुलै, २०२३ रोजी सकाळी ११.३० वाजता **श्रीमती पुष्पा दळवी, अवर सचिव यांचे दालन क्रमांक १४०४-ड, चौदावा मजला, विधान भवन, मुंबई** येथे संगणकीय आज्ञावलीद्वारे अशासकीय ठरावांचा प्राथम्यक्रम काढण्यात आला आहे. निदेशानुसार सदरहु ठराव **शुक्रवार, दिनांक २१ जुलै, २०२३ रोजी** खालीलप्रमाणे चर्चेला घेण्यात येणार आहेत :-

**(मंगळवार, दिनांक १८ जुलै, २०२३ रोजीच्या बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार खालील ठराव दाखविण्यात आले आहेत) -**

**(१) डॉ.प्रज्ञा सातव, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ५५**

"दारिद्रय रेषेखालील कुटूंबाची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटूंबाचे सर्वेक्षण झालेले नाही, त्यामुळे खरोखरच दारिद्रय रेषेखाली असणाऱ्या कुटूंबांना पिवळया रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागत आहे, शासनाच्या वतीने रुपये १५,०००/- उत्पन्न मर्यादा ठरविणे, मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे रुपये ५०,०००/- वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण झाली आहे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल जनतेला दारिद्रय रेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**(२) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ६०**

"मुंबई शहरामध्ये अत्यंत मोक्याच्या जागेवर असलेल्या अनेक खाजगी मिल मालकांच्या तसेच राष्ट्रीयकृत कापड गिरण्या बंद पडल्यानंतर गिरण्या ज्याठिकाणी होत्या, त्याठिकाणी गगनचुंबी इमारती, मॉल, खाजगी कंपन्यांच्या इमारती बांधकामास सुरुवात झाली, परंतु सदर जुन्या गिरण्यांमध्ये काम करणाऱ्या कामगार व त्यांच्या कुटूंबियांना मात्र गिरण्यांच्या जागी उभ्या राहणाऱ्या इमारतींमध्ये राहण्याच्या जागा दिल्या नाहीत. तसेच मॉल, कार्यालय यामध्ये नोकऱ्यासुध्दा दिलेल्या नाहीत, गिरणीच्या जमिनीपैंकी विहित हिस्सा महानगरपालिका, म्हाडा यांना द्यावयाचा आहे. परंतु अनेक मालकांनी जमिनी म्हाडा व महानगरपालिकेस दिलेल्या नाहीत. ६७,००० घरे गिरणी कामगारांकरीता बांधणार असे आश्वासन शासनाकडून देण्यात आलेले आहे. तथापि, बांधलेली ६,९०० घरे गिरणी कामगारांना केव्हा वितरीत करण्यात येणार आणि राहिलेली ६०,००० घरे केव्हा बांधणार याबद्दल शासनाकडून कोणताही खुलासा नाही. तसेच गिरण्यांच्या चाळीत राहणाऱ्या कामगारांना ३०० चौ.फूटाच्या खोल्या देखील मिळाल्या नाहीत. गेल्या १० वर्षात अनेक कामगार मृत झाले. वर्षानुवर्षे गिरण्यांमध्ये काम केलेल्या कामगारांना गिरण्यांच्या जागेवर घरे देणे याची मागणी शासनाकडे तसेच म्हाडाकडे अनेक वर्षापासून केली जात आहे. म्हणून मुंबईतील गिरणी कामगारांना घरे देण्याच्या दृष्टीने शासनाने विहित मर्यादेचा (टाईम बाऊंड) कार्यक्रम आखून त्यांची ठोस अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(3) **श्री.जयंत आसगांवकर, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ४९**

"राज्यातील विनाअनुदान तत्वावरील मान्यता प्राप्त माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावरील राज्यातील सर्व माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरती तसेच विविध आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध होण्यासाठी सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(४) **श्री.रमेशदादा पाटील, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ९१**

"राज्यातील किल्ले व दुर्ग यांचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता या किल्ले व दुर्गांचे जतन संवर्धन करुन परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देऊन या सर्व किल्ल्यांचे व दुर्गांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहेत."

(५) **श्रीमती उमा खापरे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ८०**

"राज्यात अनाथ, निराधार, परितक्त्या, घटस्फोटित, विधवा, अनैच्छिक मातृत्व लाभलेल्या अपादग्रस्त व शिक्षणाचा अभाव असणाऱ्या महिलांचा होणारा शारीरिक, मानसिक व सामाजिक छळ थांबवून त्यांची शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नती होऊन महिलांना आत्मनिर्भर करण्यासाठी शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १८ जुलै, २०२३

**जितेंद्र भोळे**
सचिव (१)(कार्यभार)
महाराष्ट्र विधानपरिषद

**<u>याची प्रत :-</u>**

१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सदस्य
२) मा.उप सभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
३) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
४) सचिव (१)(कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
५) सचिव (२)(कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी
७) प्रधान सचिव, संसदीय कार्य विभाग, विधान भवन, मुंबई
८) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये
९) संगणक कक्ष (संकेतस्थळ)
१०) एम.के.सी.एल.कक्ष (आज्ञावली)